# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५११७७/१० ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-अभिलेख धारिका क्र. / निवडणूक दिनांक/ ६५४८ /सन २०१९. दिनांक /८/२०१९.

4 SEP 2019

३१५

**वाचले** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (३).

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३२.

३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६४.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१०).

५. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६.

६. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v).

**प्रस्तावना :-**

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये दिनांक १४.२.२०१३ रोजी विविध प्रकारच्या सुधारणा झालेल्या आहेत. असुधारीत कलम ७३ जी मध्ये संचालक मंडळाच्या पाच वर्षाच्या कालावधीची गणना निवडणूकीनंतर घेण्यात आलेल्या संचालक मंडळाच्या पहिल्या सभेपासून करण्याची तरतुद होती. मात्र सुधारणेनंतर कलम ७३ जी वगळण्यात आलेले आहे. संचालक मंडळाच्या पाच वर्षाच्या कालावधीबाबत सुधारीत कलम ७३ अअअ (३) मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

*"The term of the office of the elected members of the committee and its office bearers shall be five years* ***from the date of election*** *and the term of the office bearers shall be co-terminus with the term of the committee and on the expiry of the term of the committee, the members shall be deemed to have vacated their offices as members of the committee. "*

*उपरोक्त सुधारीत तरतुदीचे अवलोकन केले असता, संचालक मंडळाचा कालावधी निवडणूकीच्या दिनांकापासून* (Date of Election) पाच वर्षाचा राहील अशी तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु सदर तरतुदीत निवडणूकीचा दिनांक (Date of Election) म्हणजे नक्की कोणता दिनांक हि बाब स्पष्ट करण्यात आलेली नाही. कारण निवडणूक प्रक्रियेमध्ये नामनिर्देशन पत्र दाखल करणे, छाननी करणे, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतीम यादी प्रसिध्द करणे, प्रत्यक्ष मतदान घेणे व अंतीमत: मतमोजणी करुन निकाल जाहिर करणे इ. विविध टप्प्यांचा समावेश निवडणूक प्रक्रियेमध्ये होतो. त्यामुळे या प्रक्रियेमधील नेमक्या कोणत्या टप्प्याला निवडणूकीचा दिनांक (Date of Election) म्हणावयाचे याबाबत सहकार कायदयामध्ये स्पष्टता नसल्याने निवडणूकीचा दिनांक (Date of Election) म्हणजे काय ? ही बाब स्पष्ट करण्याची आवश्यकता प्राधिकरणाच्या विचाराधीन होती.

ज्याअर्थी उमेदवारी मागे घेता येईल ती मुदत संपल्यानंतर जेवढया जागा निवडावयाच्या आहेत त्या जागेएवढे किंवा त्यापेक्षा कमी नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिल्यास उमेदवारी मागे घेण्याच्या अंतीम दिनांकास नियम ३२ मधील तरतुदी अन्वये नमुना ई ९ मध्ये असा उमेदवार किंवा असे सर्व उमेदवार यथोचितरित्या निवडून आल्याचे जाहिर करण्याची तरतुद आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ६४ अनुसार मतमोजणी/फेर मतमोजणी नंतर ज्या उमेदवाराला सर्वात अधिक वैध मते देण्यात आली असतील असा उमेदवार निवडूनआला असल्याचे नमुना ई १७ मध्ये घोषित करण्याची तरतुद आहे. त्यामुळे नमुना ई १७ मध्ये घोषित

केल्याच्या दिनांकास असे उमेदवार किंवा असे सर्व उमेदवार संचालक म्हणून निवडून आल्याचे जाहिर केले जाते.

ज्याअर्थी उपरोक्त विविध कारणांमुळे व सहकार कायदयामध्ये स्वयंस्पष्ट तरतुद नसल्यामुळे निवडणूकीच्या दिनांकाबाबत (Date of Election) अधिक स्पष्टता आणण्याची बाब प्राधिकरणाच्या विचाराधीन होती.

त्याअर्थी प्राधिकरण निवडणूकीच्या दिनांकाबाबत (Date of Election) खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v) अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण आदेश देत आहे की,

१. निवडणूकीचा दिनांक (Date of Election) म्हणजे निवडणुकीच्या निकालाचा दिनांक (Date of Result) म्हणून विचारात घेऊन निवडणूक निकालाच्या दिनांकापासून संचालक मंडळाच्या पाच वर्षाच्या कालावधीची गणना करावी.

२. एकाच निवडणूकीत सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आलेले असल्यास नमुना ई ९ निकालपत्रात अंतीम उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक हा निवडणूकीचा दिनांक (Date of Election) म्हणून निश्चित करावा.

३. एकाच निवडणूकीत सर्व उमेदवार मतदानाने निवडून आलेले असल्यास नमुना ई १७ निकालपत्रात मतमोजणीचा दिनांक हा निवडणूकीचा दिनांक (Date of Election) म्हणून विचारात घ्यावा. मतमोजणी एका दिवसापेक्षा जास्त दिवस चाललेली असल्यास मतमोजणीचा शेवटचा दिवस हा निवडणूकीचा दिनांक (Date of Election) म्हणून निश्चित करावा.

४. एकाच निवडणूकीत काही उमेदवार बिनविरोध तर काही उमेदवार मतदानाने निवडून आलेले असल्यास नमुना ई ९ व ई १७ निकालपत्रांपैकी नमुना ई १७ निकालपत्रातील मतमोजणीचा दिनांक हा निवडणूकीचा दिनांक (Date of Election) म्हणून निश्चित करावा.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशाने.**

०४/०९/१९

**(यशवंत गिरी)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)